# दि रीडिंग क्लब’ उपक्रम अहवाल- कार्यक्रम क्र. २

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

दि. **२३/०४/२०२५ (बुधवार)** रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या *‘दि रीडिंग क्लब’* या उपक्रमांतर्गत प्रेरणादायी ग्रंथ *“गरुड झेप”* याचे वाचन व सादरीकरण आयोजित करण्यात आले. हा ग्रंथ भारतीय राजस्व सेवा (IRS) अधिकारी **भरत आंधळे** यांनी लिहिला आहे. या वाचनाचे सादरीकरण **श्री. विशाल बोरगावकर** यांनी केले. या कार्यक्रमास विद्याशाखेचे शैक्षणिक संयोजक व ऑफिस स्टाफ उपस्थित होते.



*“गरुड झेप”* या पुस्तकात लेखकाने आपल्या जीवनातील संघर्ष, स्वप्ने आणि यशस्वी होण्यासाठी केलेल्या कठोर प्रयत्नांची कहाणी मांडली आहे. ग्रामीण भागातून सुरू झालेला प्रवास, शिक्षणातील अडचणी, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि शेवटी केंद्रीय सेवेत निवड होण्यापर्यंतचा प्रवास हा प्रत्येक वाचकाला प्रेरणा देणारा आहे.

श्री. बोरगावकर यांनी ग्रंथातील महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व समुपदेशकांना मिळणाऱ्या शिकवणीचे सखोल विवेचन केले. त्यांनी *“गरुड झेप”* या शीर्षकाचा अर्थ समजावून सांगत प्रत्येक व्यक्तीमध्ये असलेल्या अमर्याद क्षमतेची जाणीव करून दिली. त्यांच्या सादरीकरणातून शिक्षक व समुपदेशकांना आत्मविश्वास, जिद्द आणि सातत्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पुस्तकातील विचारांवर चर्चा केली व हा उपक्रम अधिकाधिक प्रभावी करण्यासाठी सूचना दिल्या. सर्वांनीच या वाचन उपक्रमाचे कौतुक केले व अशा प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन व मनोगत सादरीकरण नियमितपणे आयोजित करण्याची गरज व्यक्त केली. एकूणच, *“गरुड झेप”* या पुस्तकाच्या वाचनाने आणि त्यावरील चर्चेने सर्व सहभागींच्या मनावर सकारात्मक ठसा उमटवला. *दि रीडिंग क्लब*चा हा उप क्रम शैक्षणिक व वैचारिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला आहे.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मु.वि., नाशिक